# जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम

पहा :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र व परिपत्रक क्र. Insp-I/33/2021, दि. १६/०४/२०२१
२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र व परिपत्रक क्र. Insp-I/34/2021, दि. २२/०४/२०२१
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे एस.एम.पी.आय.एल. ०४/२०२०, दि. १७/०५/२०२१ मधील आदेश.
४. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे पत्र कं. एन-२१७८/आर(जे)/२०२१ दि. १७/०५/२०२१.

---

आदेश क्र.१२८/२०२१ दिनांक :२१/०५/२०२१.

संदर्भांकित परिपत्रक व पत्र तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे एस.एम.पी.आय.एल ०४/२०२०, दिनांक १७/०५/२०२१ मधील आदेशाच्या अनुषंगाने विधीज्ञ मंडळ, वाशिम, सरकारी अभियोक्ता, वाशिम, पोलीस अधिक्षक, वाशिम व अधिक्षक, जिल्हा कारागृह, वाशिम यांचे सोबत चर्चा केल्यानंतर, मी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम दिनांक २४ मे, २०२१ पासून न्यायालयीन कामकाजाबाबत खालीलप्रमाणे व्यवस्था करीत आहे.

१. न्यायालयीन कामकाजाच्या वेळा

| | |
|---|---|
| न्यायालयीन कामकाजाची वेळ | सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० |
| कार्यालयीन कामकाजाची वेळ | सकाळी १०.०० ते दुपारी ०१.३० |

सर्व जामीन अर्ज, तातडीचे अर्ज अर्जदारांना किंवा त्यांचे वकीलांना त्याच दिवशी सुनावणी व आदेशाकरीता पटलावर घ्यावयाचे असल्यास त्यांनी तसे अर्ज शक्यतोवर ई-फायलिंग द्वारेच दाखल करावेत शक्य नसल्यास दिलेल्या ई-मेल द्वारे दाखल करावेत.

अशा प्रकारे दाखल केलेल्या अर्ज/दाव्यांची मुळ प्रती (Hard Copies) ७ दिवसांचे आत न्यायालयात सादर करावी. तसेच या व्यतिरिक्त जी प्रकरणे दाखल करावयाची असतील ती सुध्दा ड्रॉप बॉक्स मध्ये ठेवावीत. सदरची प्रकरणे २४ तासानंतर हाताळण्यात येतील. ड्रॉप बॉक्स मध्ये अशी प्रकरणे ठेवण्याकरीता पुढे नमुद केलेली प्रक्रिया अवलंबवावी.

पक्षकार व विधीज्ञ यांना त्यांचे अर्ज, दावे व इतर तातडीच्या प्रकरणांची ई-फायलिंग जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम यांच्या संकेत स्थळावरील निर्देशानुसार

URLhttps://filing.ecourts.gov.in/pdedev/index.php या प्रणालीव्दारे करता येईल.

**तसेच खालील ईमेल वर सुध्दा दाखल करता येतील.**

अ) जिल्हा न्यायालयातील प्रकरणे - dcwasfilling@gmail.com
(मोटार अपघात प्रकरणासह)

ब) दिवाणी न्यायालयातील प्रकरणे - cjsdwasfilling@gmail.com

क) न्यायदंडाधिकारी न्यायालयातील प्रकरणे - cjmwasfilling@gmail.com

सदरची सुविधा वापरणेकरीता मदत हवी असल्यास संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम दुरध्वनी कं. ०७२५२-२३३६६४ या कमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

२. **आभासी सुनावणी (Hearing through Video Conferancing)**

आभासी सुनावणी कोष्टकात दिलेल्या व्हिडीओ लिंकवर करता येईल. त्याचप्रमाणे अर्ज, दाव्याशिवाय इतर कागदपत्रे वेळेवर दाखल करण्याचे झाल्यास कोष्टकात दिलेल्या ईमेल वर दाखल करता येतील. याशिवाय जे विधीज्ञ किंवा पक्षकार व्हिडीओ लिंकवर सुनावणी करण्यास सक्षम नसतील त्यांचेकरीता सुनावणीची व्यवस्था व्ही.सी. रुम संगणक कक्षाजवळ जिल्हा न्यायालय, वाशिम येथे करण्यात आलेली आहे. त्या प्रणालीचा वापर संबंधीतांना करता येईल.

आभासी सुनावणी दरम्यान कुठल्याही प्रकारची अडचण आल्यास संबंधीतांनी कोष्टकात दिलेल्या लिपीकांच्या भ्रमणध्वनी कमांकावर संपर्क साधावा.

३. **ड्रॉप बॉक्स**

**अ.** जिल्हा न्यायालय, वाशिम इमारतीतील पहिल्या माळ्यावर जिल्हा व सत्र न्यायालयाशी संबंधीत प्रकरणासाठी न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, वाशिम यांचे कक्षात ठेवण्यात आलेल्या ड्रॉप बॉक्स मध्ये आपली प्रकरणे ठेवावी.

**ब.** जिल्हा न्यायालय, वाशिम इमारतीतील दुस-या माळ्यावर दिवाणी न्यायालयाशी संबंधीत प्रकरणासाठी न्यायीक विभाग, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वाशिम यांचे कक्षात ठेवण्यात आलेल्या ड्रॉप बॉक्स मध्ये आपली प्रकरणे ठेवावी.

**क.** जिल्हा न्यायालय, वाशिम इमारतीतील तळ मजल्यावर मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम न्यायालयाशी संबंधीत (फौजदारी) प्रकरणासाठी नझारत विभाग, मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम यांचे कक्षात ठेवण्यात आलेल्या ड्रॉप बॉक्स मध्ये आपली प्रकरणे ठेवावी.

ड. जिल्हयातील प्रत्येक प्रमुख न्यायालय यांनी त्यांचे ठिकाणी उपलब्ध असलेल्या जागेप्रमाणे ड्रॉप बॉक्स ठेवण्याची व्यवस्था करावी व पुढील नमूद प्रकिया अवलंबवावी.

सोबत जोडलेल्या पोचपावती दोन प्रती संबंधीतांनी सादर कराव्या. ड्रॉप बॉक्स च्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांकडून पोचपावती प्राप्त करावी. पोचपावतीचा नमुना जिल्हा न्यायालय, वाशिम चे संकेतस्थळ districts.ecourts.gov.in/washim वरून डाउनलोड करता येईल. सदर पोचपावतीशिवाय ड्रॉप बॉक्स मध्ये कोणत्याही प्रकारचे दावे / अर्ज ठेवल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. सदर प्रकरणांची माहिती नोंदणी झाल्यानंतर सी.आय.एस. मध्ये नियमीत पध्दतीनुसार तपासून घ्यावी.

**प्रकरणे ड्रॉप बॉक्स मध्ये ठेवण्याची वेळ सकाळी १०.३० ते ११.३०.**

**वरील वेळेनंतर प्रकरणे ड्रॉप बॉक्स मध्ये स्विकारली जाणार नाहीत.**

४. **जामीन / प्रतिज्ञालेख**

जिल्हा न्यायालय प्रकरणातील तसेच न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालयातील जामीन भरण्याची व प्रतिज्ञालेख करण्याची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच राहील.

५. **उद्वाहन (Lift) चा वापर**

जिल्हा न्यायालय, वाशिम मधील प्रवेशव्दारा जवळील उद्वाहन (Lift) पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात येतील.

६. **हमदस्त**

आरोपी तुरूंगातुन सोडण्याचे आदेशाचे हमदस्त मध्यवर्ती कारागृहाला न्यायालयाकडून थेट ईमेल व्दारे पाठविण्यात येतील.

७. **प्रकरणे पटलावर घेणे**

न्यायीक आदेश अनुपालन व प्रशासकीय पूर्ततेशिवाय इतर कोणतेही प्रकरण तातडीचे कामाकरीता पटलावर घ्यावयाचे झाल्यास सदर प्रकरण पटलावर घेण्याची सूचना विरूध्द पक्षाला दिल्याशिवाय अशी प्रकरणे पटलावर घेतली जाणार नाहीत.

## ८. रिमांड

सर्व आरोपी रिमांड न्यायालयात शक्यतोवर त्या त्या पोलीस स्टेशनचे व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे कोष्टकात नमूद न्यायालयाचे व्हि.सी. लिंकव्दारे हजर करण्यात यावीत. याशिवाय न्यायालयास योग्य वाटल्यास, तांत्रिक अडचणीमुळे किंवा तशी व्यवस्था पोलीस स्टेशनला नसल्यास किंवा आरोपीने विनंती केल्यास त्यांना न्यायालयात रिमांड करीता प्रत्यक्ष हजर करता येईल.

प्रत्येक पोलीस स्टेशन मधील एक पोलीस कर्मचारी रोजचे रिमांड व केस डायरी आणून त्या त्या न्यायालयात सादर करतील. तथापि न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपींची हजेरी नेहमीप्रमाणे कारागृहात व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे घेण्यात येईल.

**वरीलबाबत अडचण आल्यास संबंधितांनी फक्त कार्यालयीन वेळेत दुरध्वनी कं. ०७२५२-२३३६६४ वर संपर्क साधावा.**

## ९. फौजदारी प्रकिया संहिता कलम १६४ अंतर्गत जबाब नोंदणी

फौजदारी प्रकिया संहिता कलम १६४ अंतर्गत नोंदण्यात येणा-या जबाबाकरीता साक्षीदार किंवा आरोपी यांचा जबाब नोंदणीकरीता संबंधीत पोलीस अधिका-यांनी संबंधीत न्यायालयास ईमेलव्दारे आगाऊ सूचना द्यावी. त्यामध्ये बयाण देणा-या व्यक्तींची नांवे उघड करु नयेत.

## १०. न्यायनिवाडे, निर्णय व आदेश

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक १६/०४/२०२१ रोजीचे परिपत्रकाप्रमाणे ज्या न्यायाधीशांना ज्या प्रकरणांमध्ये दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद झाला आहे त्यामध्ये न्यायनिवाडा, निर्णय किंवा आदेश द्यावयाचा आहे अशा प्रकरणातील डिक्टेशन देण्याचे काम न्यायाधीशांनी शक्यतोवर कार्यालयीन वेळेत करण्याचा प्रयत्न करावा., याकरीता लघुलेखकांना बोलावून त्यांची मदत घ्यावी.

## ११. न्यायालय इमारत व परिसरात प्रवेश

सर्व विधीज्ञ व पक्षकार यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी न्यायालय परिसरात येण्याचे व पक्षकारांना हजर करण्याचे टाळवे. त्याचप्रमाणे पक्षकारांना न्यायालय परिसरात येवू देवू नये. परंतू, जामीनदाराचे प्रतिज्ञापत्र करणेकरीता किंवा रोख जामीन भरणेकरीता फक्त जामीनदारास नेमून दिलेल्या ठिकाणी येता येईल.

१२. **कर्मचा-यांची उपस्थिती**

जे कर्मचारी ग्रिष्मकालीन सुट्टीवर आहेत त्यांचे व्यतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम येथील आस्थापना विभाग, रोख व वित्त विभाग, न्याय शाखा, निरीक्षण विभाग, अभिलेख व नक्कल विभाग, मुद्देमाल विभाग, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, वाशिम, मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम, जिल्हा सरकारी वकील कार्यालय, वाशिम, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, वाशिम या इतर विभागांमध्ये रोटेशन प्रणालीनुसार १५ टक्के कर्मचारी वर्गाने दररोज हजर राहून प्रलंबित कामांचा निपटारा करतील. रात्रपाळी / दिवसपाळी चौकीदार यांनी आळीपाळीने १५ टक्के उपस्थितीत सहायक अधिक्षक वित्त विभाग, यांचे निर्देशानुसार कर्तव्य बजावणी करावी.

१३. **न्यायीक अधिका-यांचा पद्भार**

जिल्हा न्यायालय, वाशिम कार्यालयीन आदेश क्रं. ब-८/१२०/२०२१ दि. ०७/०५/२०२१, आदेश क्रं. ब-८/१२१/२०२१ दि. १०/०५/२०२१, आदेश क्रं. ब-८/१२२/२०२१ दि. ११/०५/२०२१ नुसार न्यायीक अधिका-यांकडे सोपविलेल्या पद्भारानुसार संबंधीत न्यायालय / विभागाचे कामकाज सुध्दा संबंधीत न्यायीक अधिकारी यांनी पाहावे.

**कोष्टक - १**

**जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम**

Name of the Courts for dealing Bail application and urgent matters in respect of Criminal Cases (Sessions Trial) and Civil matters (Appellate Court)

| E-mail / Link | Bail applications and urgent matters of the Court of | Name of the Courts for dealing Bail applications and urgent matters | Court working days / date | Contact Number |
|---|---|---|---|---|
| dj1washim@gmail.com<br>https://meet.google.com/ jzh-sgte-nme | 1. Principal District & Sessions Judge, Washim<br>2. District Judge-1 & A.S.J., Washim | District Judge-1 & A.S.J., Washim | 24/05/2021 to 30/05/2021 | 8668828363 |
| adjwashim@gmail.com<br>https://meet.google.com/svx-szep-tiu | 1. District Judge & A.S.J. Link-Court, Mangrulpir<br>2. Adhoc District Judge-1 & A.S.J., Washim | Adhoc District Judge-1, Washim | 24/05/2021 to 30/05/2021 | 9665192979 |

| Link / e-mail | Bail applications and urgent matters of the Court of | Name of the Courts for dealing Bail applications and urgent matters | Court working days / date | Contact Number |
|---|---|---|---|---|
| dj1washim@gmail.com<br>https://meet.google.com/ jzh-sgte-nme | 1. Principal District & Sessions Judge, Washim<br>2. District Judge-1 & A.S.J., Washim<br>3. District Judge & A.S.J. Link-Court, Mangrulpir<br>4. Adhoc District Judge-1 & A.S.J., Washim | District Judge-1 & A.S.J., Washim | 31/05/2021 to 06/06/2021 | 8668828363 |

**Courts of Civil Judge (Senior Division) at Washim Headquarter**
**Dates for taking up Urgent matters**

| Link / e-mail | Name of the Courts | Court working days / date | Contact Number |
|---|---|---|---|
| jtcjsdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/gqr-syuu-cgc | Joint Civil Judge (S.D.), Washim | 24/05/2021<br>31/05/2021<br>02/06/2021<br>04/06/2021 | 7020449094 |
| 2jtcjsdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/nvx-jcrm-hxp | 2nd Joint Civil Judge (S.D.), Washim | 25/05/2021<br>27/05/2021 | 8605484143 |
| 3jtcjsdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/fis-jjoj-zym | 3rd Joint Civil Judge (S.D.), Washim | 28/05/2021<br>01/06/2021<br>03/06/2021 | 9975723807 |

**Courts of Chief Judicial Magistrate at Washim Headquarter**
**Dates for taking Remand work and Urgent matters**

| Link / e-mail | Remand and urgent matters of the Court of | Name of the Courts for dealing Remand and urgent matters | Court working days / date | Contact Number |
|---|---|---|---|---|
| cjmwashim@gmail.com<br>https://meet.google.com/rwh-pqfd-xea | Chief Judicial Magistrate, Washim | Chief Judicial Magistrate, Washim | 24/05/2021 to 30/05/2021 | 7875975001 |
| jtcjsdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/gqr-syuu-cgc | Chief Judicial Magistrate, Washim | Joint Civil Judge (S.D.), Washim | 31/05/2021<br>02/06/2021<br>04/06/2021 | 7875975001 |
| 3jtcjsdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/fis-jjoj-zym | Chief Judicial Magistrate, Washim | 3rd Joint Civil Judge (S.D.), Washim | 01/06/2021<br>03/06/2021 | 7875975001 |

**Courts of Principal Magistrate Juvenile Justice Board at Washim Headquarter**
**Dates for taking Remand work and Urgent matters**

| Link / e-mail | Remand and urgent matters of the Court of | Name of the Courts for dealing Remand and urgent matters | Court working days / date | Contact Number |
|---|---|---|---|---|
| 2jtcjsdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/nvx-jcrm-hxp | Principal Magistrate Juvenile Justice Board Washim | 2nd Joint Civil Judge (Sr.Dn.), Washim / P.M.J.J.B., Washim | 24/05/2021 to 28/05/2021 | 8605484143 |
| jtcjsdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/gqr-syuu-cgc | Principal Magistrate Juvenile Justice Board Washim | Joint Civil Judge (Sr.Dn.), Washim | 31/05/2021<br>02/06/2021<br>04/06/2021 | 8605484143 |
| 3jtcjsdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/fis-jjoj-zym | Principal Magistrate Juvenile Justice Board Washim | 3rd Joint Civil Judge (Sr.Dn.), Washim | 01/06/2021<br>03/06/2021 | 8605484143 |

**Courts of Judicial Magistrate First Class at Washim Headquarter**
**Dates for taking Remand work and Urgent matters**

| Link / e-mail | Remand and urgent matters of the Court of | Name of the Courts for dealing Remand and urgent matters | Court working days / date | Contact Number |
|---|---|---|---|---|
| jtcjjdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/raa-pdzp-mgj | 1) Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim<br>2) 2nd Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim<br>3) 3rd Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim | Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim | 31/05/2021 to 04/06/2021 | 9359884954 |
| 2jtcjjdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/rbx-mfox-xho | 1) Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim<br>2) 2nd Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim<br>3) 3rd Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim | 2nd Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim | 24/05/2021<br>27/05/2021 | 7350917288 |
| 3jtcjjdwashim@gmail.com<br>https://meet.google.com/zxs-wtpi-zrx | 1) Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim<br>2) 2nd Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim<br>3) 3rd Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim | 3rd Joint Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Washim | 25/05/2021<br>28/05/2021 | 8975960441 |

**टिप :- सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीचे सत्र न्यायालयाचे व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयाचे रिमांड संबंधीत यापूर्वी निर्गमीत केलेले आदेश यथावत कायम राहतील.**

**१४.** सदरची न्यायालयीन कामकाजाची पध्दती परिस्थितीजन्य बदल किंवा सुधार करण्याचे अधीन राहून असेल.

परिस्थितीचा विचार करता हे कार्यालय गर्दी टाळण्याकरीता ड्रॉप बॉक्स मध्ये प्रकरणे ठेवण्याचे वेळात बदल करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

१५. कोविड-१९ संबंधी केंद्र शासन, राज्य शासन व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सर्व सुरक्षा व खबरदारी संबंधीच्या सूचनांचे पालन करण्याकरीता कार्यरत असलेल्या त्रिसदस्यीय समितीने प्रबंधक यांच्या मदतीने सर्व सुरक्षा व खबरदारीचे उपाय कायम व सुरळीत व्हावे याकरीता यथोचित काळजी घ्यावी.

<u>टिप</u> : १. वरीलप्रकारे न्यायालयीन कामकाजाची कार्यप्रणाली तालुका न्यायालयाने तेथील वकील संघटनेच्या अध्यक्षांसोबत किंवा पदाधिका-यासोबत चर्चा करून राबवावी.
२. प्रकरणे ड्रॉप बॉक्स मध्ये देतांना यासह जोडण्यात आलेल्या ड्रॉप बॉक्स पोचपावती मध्ये माहिती भरून पोहच घ्यावी.

( डॉ. आर. आर. तेहरा )
प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वाशिम.

जा.कं./ /२०२१
जिल्हा न्यायालय, वाशिम
दिनांक : /०५/२०२१

<u>प्रत माहिती तथा कार्यवाही करीता (बाहेरगांवी ईमेलव्दारे)</u>

१) मा. जिल्हा न्यायाधीश - १, वाशिम / जोड न्यायालय, मंगरूळपीर.
२) मा. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), वाशिम / मंगरूळपीर.
३) मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम.
३) मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम
४) मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वाशिम / मालेगांव / रिसोड / मंगरूळपीर / कारंजा / मानोरा.
५) मा. सहायक सरकारी अभियोक्ता कार्यालय, वाशिम
६) मा. अध्यक्ष, विधीज्ञ मंडळ, वाशिम / मंगरूळपीर / कारंजा / मानोरा / मालेगांव / रिसोड.
७) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम.
८) मा. पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.
९) मा. अधिक्षक, जिल्हा कारागृह, वाशिम.
१०) अधीक्षक ( निरिक्षण / न्यायीक / वित्त ), जिल्हा न्यायालय, वाशिम.
११) संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, वाशिम.

**प्रबंधक,**
जिल्हा न्यायालय, वाशिम

# ड्रॉप बॉक्स पोचपावती

| | |
|---|---|
| १. वकील किंवा पक्षकाराचे पूर्ण नांव | |
| ईमेल आयडी | |
| मोबाईल नंबर | |
| २. पक्षकारांची नांवे | |
| वादी / अर्जदार | |
| प्रतिवादी / गैरअर्जदार | |
| दाव्याचा / अर्जाचा प्रकार<br>दिवाणी किंवा फौजदारी | |
| जिल्हा न्यायालय / दिवाणी न्यायालय /फौजदारी न्यायालय /लघुवाद न्यायालय /मो.अ. दावा. | |

**वाशिम**

**दिनांक** **अर्जदाराची सही**

**पोचपावती देणा-याची सही / पदनाम**